# शिवाजी विद्यापीठ खोदणार नवीन विहीर

## जलयुक्त विद्यापीठचा पुढील टप्पा, पाणीसाठ्यात होणार वाढ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

पाण्याच्या बाबतीमध्ये स्वयंपूर्ण असलेल्या शिवाजी विद्यापीठाने जलसंधारणासाठी आणखी एक पाऊल टाकले आहे. विद्यापीठाच्या पाणीसाठ्यामध्ये वाढ व्हावी, तसेच परिसरातून बाहेर जाणाऱ्या पाण्याला आळा बसावा यासाठी नवीन विहीर खोदण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतलेला आहे.

२०१५ सालच्या दुष्काळापासून धडा घेत शिवाजी विद्यापीठाने जलसंधारणाच्या कामांना सुरुवात केली. त्यासाठी नवीन शेततळ्यांची खोदाई करणे, आहे त्या जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन करणे त्याचबरोबर वाहून जाणारे पाणी रोखण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली. विद्यापीठाच्या या



मोहिमेला धवल असे यश आले. या मोहिमेमुळे विद्यापीठाच्या परिसरातील भूजल पातळीमध्ये वाढ झाली, तर विद्यापीठ पाण्याच्या बाबतीमध्ये स्वयंपूर्ण झाल्याने विद्यापीठास महापालिकेकडून घ्यावे लागणारे पाणी आणि त्यासाठी करावा लागणारा खर्च बंद झाला. विद्यापीठाच्या या जलयुक्त विद्यापीठ मोहिमेचा डंका जगभर वाजला. या उपक्रमाची आंतरराष्ट्रीय पातळीवरही दखल घ्यावी लागली, तर वॉटर मॅन राजेंद्र सिंह यांनीही शिवाजी विद्यापीठ पाणीदार विद्यापीठ असल्याचे मान्य केले. सध्या या जलयुक्त विद्यापीठ मोहिमेचा पुढील टप्पा सुरू करण्यात आला आहे. त्याअंतर्गत या उन्हाळ्यात सध्या असणाऱ्या जलसाठ्याची लेव्हलिंग करणे, पाणीसाठ्याकडे जाणाऱ्या चरींची स्वच्छता करणे, उतारांवर बांध घालणे अशी कामे करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर पावसाळ्यात राजेंद्रनगरच्या ओढ्याकडे विद्यापीठ परिसरातून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जात असे. विद्यापीठ परिसरातून बाहेर जाणारे हे पाणी अडवून त्याचा वापर करणे आणि ते याच परिसरात जिरवणे आवश्यक होते. त्यातून या परिसरात विहीर घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात १०० फूट व्यासाच्या विहिरीची खोदाई करण्यात येणार आहे. तसेच या विहिरीला मोटर बसवून विहिरीतील पाणी पाईपलाईनद्वारे फिल्टर हाऊसकडे नेण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यापीठ परिसरात बाहेर जाणारे पाणी थांबवण्यात यश येणार आहे. त्याचबरोबर विद्यापीठासाठी मुबलक पाणी उपलब्ध होणार आहे. त्याचा लाभ विद्यापीठाच्या जलयुक्त विद्यापीठ या योजनेला होणार आहे.

सकाळ

# कौशल्य विकासासाठी दोन लाखांचा निधी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : सोक्टास कंपनीने शिवाजी विद्यापीठाला दोन लाख रुपयांचा निधी सामाजिक दायित्वाच्या अंतर्गत दिला. या निधीमधून विद्यापीठात कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू व्हावा, अशी कंपनीची अपेक्षा आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे कंपनीचे ऑपरेटिंग ऑफिसर सदानंद गुप्ता यांनी हा निधी सुपूर्द केला.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी प्र-कुलगुरू



डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

यावेळी गुप्ता म्हणाले, ''सामाजिक दायित्वाच्या भावनेतून उद्योगाकडून देण्यात येणारा निधी योग्य हातांत पडून त्याचा योग्य विनियोग व्हावा, अशी कंपनीची भावना आहे. त्यातूनच विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्रामार्फत युवकांसाठी राबविण्यात येणारे अनेक उपक्रम पाहण्यात आले. केंद्र सरकारच्या स्कील इंडिया या उपक्रमांतर्गत अनेक उपक्रम विद्यापीठाकडून राबविण्यात येतात. त्याला मदत म्हणून आम्ही ही मदत विद्यापीठाला देण्याचे ठरविले.''

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''सोक्टास कंपनीने अत्यंत विश्वासाने विद्यापीठाला हे अर्थसाह्य केले आहे. त्याचा विनियोग कौशल्य विकास केंद्रातर्फे योग्य कारणांसाठी केला जाईल. अशा प्रकारे व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या साहाय्याने स्कील ऑन व्हील्स सारख्या विविध उपक्रमांची व्याप्ती वाढविणे शक्य आहे. त्या दृष्टीनेही प्रयत्न केले जातील.''

यावेळी अधिष्ठाता व कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

3 APR 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्य विकासासाठी दोन लाखांचा निधी

## सामाजिक उत्तरदायित्व म्हणून शैक्षणिक मदत – गुप्ता : सोक्टास कंपनीने जपली सामाजिक बांधिलकी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने कौशल्य विकासाच्या अनुषंगाने चालविलेले कार्य महत्वाचे असून त्याला अधिक चालना देण्यासाठी 'सोक्टास' कंपनीतर्फे २ लाख रुपयांचा निधी विद्यापीठास प्रदान करण्यात आला. हा धनादेश कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने कौशल्य विकास केंद्रासाठी 'सोक्टास' कंपनीतर्फे २ लाख रुपयांचा निधी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करताना सोक्टास इंडिया प्रा. लि. कंपनीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सदानंद गुप्ता. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, डॉ. पी. डी. राऊत आदी.

यावेळी कागल येथील पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सोक्टास इंडिया प्रा. लि. कंपनीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सदानंद गुप्ता म्हणाले, सामाजिक उत्तरदायित्व म्हणून शैक्षणिक कामासाठी मदत करताना कंपनीला आनंद वाटत आहे. सामाजिक दायित्वाच्या भावनेतून उद्योगाकडून दिलेल्या निधीचा योग्य विनियोग व्हावा, अशी कंपनीची भावना आहे. विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्रामार्फत युवकांसाठी राबविण्यात येणाऱ्या अनेक उपक्रमासाठी या निधीचा उपयोग होईल. "स्कील इंडिया" या उपक्रमांतर्गत अनेक उपक्रम विद्यापीठाकडून राबविण्यात येतात. त्याला मदत म्हणून आम्ही ही मदत केली आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, सोक्टास कंपनीने अत्यंत विश्वासाने विद्यापीठाला हे अर्थसाहाय्य केले आहे. त्याचा विनियोग कौशल्य विकास केंद्रातर्फे योग्य कारणांसाठी केला जाईल. अशा प्रकारे व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या सहाय्याने 'स्कील ऑन व्हील्स' सारख्या विविध उपक्रमांची व्याप्ती वाढविणे शक्य आहे. त्या दृष्टीनेही प्रयत्न करण्याचा माझा मनोदय आहे.

अधिष्ठाता व कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे समन्वयक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्यासह कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ‘सोक्टास’कडून दोन लाखांचा निधी

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाने कौशल्य विकास केंद्राला अधिक चालना देण्यासाठी ‘सोक्यस’ कंपनीच्या व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या अंतर्गत दोन लाख रुपयांचा निधी विद्यापीठास प्रदान करण्यात आला. कागल येथील पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सोक्यस इंडिया प्रा. लि. या कंपनीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सदानंद गुप्ता यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी या निधीचा धनादेश स्वीकारला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

गुप्ता म्हणाले, ‘सामाजिक दायित्वाच्या भावनेतून उद्योगाकडून देण्यात येणारा निधी योग्य हातांत पडून त्याचा योग्य विनियोग व्हावा, अशी कंपनीची भावना आहे. त्यातूनच विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्रामार्फत युवकांसाठी राबविण्यात येणारे अनेक उपक्रम पाहण्यात आले. यावेळी अधिष्ठाता व कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए.एम. गुरव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, डॉ. पी.एस. पाटील, डॉ. भारती पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे समन्वयक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांच्यासह कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.



सोक्टास कंपनीकडून शिवाजी विद्यापीठास देण्यात आलेला दोन लाख रुपयांच्या निधीचा धनादेश सोक्टास कंपनीचे प्रमुख सदानंद गुप्ता यांच्याहस्ते स्वीकारताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

लोकमत

## देसाई कुटुंबीयांकडून तीन लाखांची देणगी : विद्यापीठात कुलगुरुंकडे धनादेश सुपूर्द

# नीलिशा देसाईच्या नावाने नवे पारितोषिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पर्यावरण अभ्यासक प्रा. डॉ. नीलिशा देसाई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नवीन पारितोषिक निर्मितीसाठी देसाई कुटुंबीयांनी मंगळवारी शिवाजी विद्यापीठाला तीन लाख रुपयांची देणगी दिली.

एम. एस्सी. भाग दोन पर्यावरणशास्त्र या अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीस 'प्रा. डॉ. नीलिशा प्रकाश देसाई' या नावाने पारितोषिक या देणगीतून दिले जाणार आहे.

या देणगीचा धनादेश प्रकाश देसाई यांनी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी अशोक देसाई, श्रीकांत देसाई, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड, 'निसर्गमित्र'चे अनिल चौगुले, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, आदी उपस्थित होते.



कोल्हापुरात मंगळवारी प्रा. डॉ. नीलिशा देसाई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नवीन पारितोषिक निर्मितीसाठी प्रकाश देसाई यांनी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे तीन लाखांच्या देणगीचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी डावीकडून पल्लवी भोसले, आसावरी जाधव, उदय गायकवाड, अशोक देसाई, श्रीकांत देसाई, अमित कुलकर्णी, प्र-कुलगुरु डॉ. डी.टी शिर्के प्रकाश देसाई, व्ही. डी. नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, पी. डी. राऊत, अनिल चौगुले उपस्थित होते.

### वाढदिनी देणगी

साडेतीन वर्षांपासून कर्करोगाशी सामना करणाऱ्या नीलिशा देसाई यांचे फेब्रुवारीमध्ये निधन झाले. त्या शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता आणि समावेशक केंद्राच्या सहायक संचालकपदी कार्यरत होत्या. त्यांचा मंगळवारी वाढदिवस होता. त्यानिमित्त त्यांच्या स्मृती अखंडितपणे जपण्याच्या उद्देशाने देसाई कुटुंबीयांनी विद्यापीठाला देणगी दिल्याचे उदय गायकवाड यांनी सांगितले.

आपल्याबरोबर संगत केली, त्यांचे सुपुत्र आज प्रतिगाम्यांसोबत जाऊन निवडणूक लढवत आहेत. समोरच्या उमेदवारांकडे काहीच मुद्दे नाहीत; केवळ माझे वडील खासदार होते म्हणून मलाही करा, अशा म्हणणाऱ्या प्रवृत्तीला नाकारा.

पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष डी. जी. भास्कर, 'रिपाइं' (गवई) गटाचे जिल्हाध्यक्ष प्रा. विश्वासराव देशमुख, काँग्रेसच्या सरलाताई पाटील, प्रा. जयंत पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रकाश आवाडे, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष पी. एन. पाटील, आमदार हसन मुश्रीफ यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी मंत्री जयवंतराव आवळे, आमदार संध्यादेवी कुपेकर, महापौर सरिता मोरे, भरमूअण्णा पाटील, संजीवनीदेवी गायकवाड, 'गोकुळ'चे अध्यक्ष रवींद्र आपटे, मानसिंगराव गायकवाड, प्रल्हाद चव्हाण, व्ही. बी. पाटील, नंदिनी बाभूळकर, राजेंद्र गड्ड्यान्नावर, भगवान काटे, यशवंत हप्पी, अनिल मादनाईक, अरुण डोंगळे, उदयानी साळुंखे, अनिल साळोखे, संगीता खाडे नगरसेवक उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेतर्फे आयोजित व्याख्यान कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. प्रदीप पाटील. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. नितीन देशपांडे, डॉ. उमेश जैन आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# रस्त्यावरील अपघातात माणुसकीचा हात द्या

## डॉ. प्रदीप पाटील : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

रस्त्यावर अपघात झाल्यानंतर वेळेत मदत मिळत नसल्याने जखमींचे हाल होतात. देशाचा सजग नागरिक म्हणून रस्त्यावरील अपघातातील जखमींना मदत करण्याचे कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन महाराष्ट्र अस्थिरोग संघटना कोल्हापूरचे अध्यक्ष डॉ. प्रदीप पाटील यांनी केले.

महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचा १ मे रोजी वर्धापदन दिन आहे. त्यानिमित्त विद्यापीठात आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. डॉ. पाटील म्हणाले, रस्त्यावर अपघात होतात. मात्र पोलिस व इतर अडचणींना सामोरे जावे लागेल या भीतीने नागरिक मदत करण्यासाठी पुढाकार घेत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता अपघातामधील जखमींना मदत करताना अडचणी येणार नाहीत. त्यामुळे जखमींना मदत केली पाहिजे.

महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचे राज्य अध्यक्ष डॉ. नितीन देशपांडे यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेतला. डॉ. संग्राम मोरे यांनी अत्यावश्यक सेवा व ॲम्ब्युलन्सबद्दल माहिती दिली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. आरती जाधव, डॉ. संदीप कदम आदी उपस्थित होते. डॉ. उमेश जैन यांनी आभार मानले.

लोकमत

# तामिळ विद्यापीठातील कागदपत्रांचे होणार संगणकीकरण; संशोधकांना अभ्यासाची संधी

संदीप आडनाईक ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तंजावरमध्ये स्थापित या तामिळ विद्यापीठातील जवळपास दीड लाख अस्पर्शित कागदपत्रांचे संगणकीकरण (डिजिटायजेशन) होणार आहे. या सामंजस्य करारामुळे मराठी भाषिक संशोधकांना, तसेच तामिळ भाषिक संशोधकांना दोन्ही विद्यापीठातील कागदपत्रांचा अभ्यास करण्याची मोठी संधी उपलब्ध होत आहे.

मराठीचा सर्वांत मोठा भोसले वंश चरित्र हा शिलालेख आजही याच परिसरातील जगप्रसिद्ध बृहदीश्वर मंदिरात कोरलेला पाहायला मिळतो. तंजावर येथे भोसले घराण्याची वंशावळ आहे.


तो अभ्यासासाठी खुला करण्यासाठी तमिळ विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सी. बालसुब्रमण्यम, कुलसचिव एस. मुथ्थुकुमार, कै. एन. अंथीयमान, डॉ. विवेकानंद गोपाळ यांनी खूप परिश्रम घेतले. मार्च २०१३ मध्ये राज्य मराठी विकास संस्थेची समिती तेथे पाठविली. त्या समितीमार्फत साडेसात लाख कागदपत्रांचे जतन, संवर्धन आणि डिजिटायजेशन करण्यात आले. यातील मोडी कागदपत्रांच्या क्युरेटिव्ह कॉन्झर्वेशन गणेश नेर्लेकर यांच्या

**अहद् तंजावर, तहद् पेशावर | भाग ३**

टीमने दोन वर्षे खपून पूर्ण केले आहे. या प्रकल्पानंतर तमिळ विद्यापीठासोबत करार करण्यामध्ये रुची दर्शवून त्यानुसार कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप यांच्या समितीने तंजावरला भेट दिली. या भेटीत त्यांनी सरस्वती महाल ग्रंथालय, धन्वंतरी महल (येथे ३५०० आयुर्वेदावरील ग्रंथ आहेत), दरबार हॉलची पाहणी केली.



शिवाजी विद्यापीठाचे संग्रहित छायाचित्र.




तामिळ विद्यापीठाचे संग्रहित छायाचित्र.

छत्रपती घराण्याचे आताचे वंशज आणि या ग्रंथालयाचे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्रीमंत शिवाजीराजे भोसले यांच्याशीही त्यांनी चर्चा केली. यावेळी ग्रंथालयाचे व्यवस्थापक रामकृष्णन, विद्यमान ग्रंथपाल डॉ. एस. सुदर्शन उपस्थित होते.

याशिवाय तमिळ भाषांतर समितीचे विभागप्रमुख आणि तमिळ विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. आर. विवेकानंद गोपाळ, द्रविडीयन युनिव्हर्सिटीचे कुप्पम यांच्याशीही समितीने चर्चा केली. डॉ. गोपाळ हे उत्कृष्ट मराठी मोडीतज्ज्ञ आहेत. शिवाय त्यांनी या ग्रंथालयात अनेक वर्षे काम केले आहे.

**(उद्याच्या अंकात : पाच वर्षांसाठी करार, सांस्कृतिक कार्यक्रमांची देवाण-घेवाण)**



तामिळ आणि मराठी संस्कृती स्वतंत्र असली तरी तंजावरमध्ये असलेली संस्कृतीची नाळ मराठीशी जोडलेली आहे. वेशभूषा वेगळी असली तरी भाषा मराठीच आहे. कालौघात त्याच्यावर दक्षिणी भाषेचा प्रभाव पडला असला तरी येथील राजांकडून मराठी जपण्याचा प्राणपणाने प्रयत्न झाला आहे. त्याचे दर्शन तंजावरमध्ये दृश्य स्वरुपात पाहायला मिळते. याशिवाय अमाप साहित्यसंपदा येथे आहे, त्यावर प्रकाश पडणे गरजेचे आहे. ही दख्खिणी मराठी भाषा अजूनही जिवंत आहे. या सामंजस्य कराराच्या निमित्ताने या दोन मराठेशाहीतील कला, साहित्य, संस्कृतीचा प्रसार, प्रचार आणि जतन होईल. नव्या इतिहासावर प्रकाश पडेल आणि दोन्ही राज्यांमध्ये सहकार्याचा सेतू बांधणे शक्य होईल.

**- डॉ. विवेकानंद गोपाळ,** तामिळ भाषांतर समितीचे विभागप्रमुख आणि तामिळ विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक, तंजावर.

# राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुखपदी डॉ. भणगे



कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुखपदी डॉ. रवींद्र भणगे यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. प्रकाश पवार यांचा तीन वर्षांचा सेवाकालावधी संपल्याने डॉ. भणगे यांची नियुक्ती झाली. सोमवारी डॉ. भणगे यांनी कार्यभार स्वीकारला.